**विशेष दिवाणी दावा क्र.५९/२०१४**

**आदेश निशाणी ७० खाली**

१. अर्जदारांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ क्रम १७ नुसार अर्जात दुरुस्ती करण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे.

२. वादीने सदरचा दावा उत्पन्न मिळणेसाठीचा व निरंतरचे ताकीदीसाठीचा दाखल केलेला आहे. सदर दावा दाखल करताना अनावधानाने व चुकीने दावा कलम १ग मध्ये मिळकतीचे वर्णन लिहिताना ''मोहोळ पैकी मौजे भोयेरे'' हे शब्द हस्तदोषाने व अनावधानाने चुकीन लिहिले आहे. त्यामुळे ''पंढरपूर पैकी मौजे तारापूर'' अशी दुरूस्ती करणे गरजेचे आहे. सदरची दुरूस्ती ही तांत्रीक स्वरूपाची आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. सबब अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. प्रतिवादी तर्फे म्हणणे सादर करण्यात आले की, सदरचा अर्ज खरा नाही व कायदेशीर नाही. प्रस्तुत अर्जातील सर्व विधाने खोटी आहेत व ती प्रतिवादीला मुळीच मान्य नाही. तसेच सदरच्या दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरूपात बदल होणार आहे व दाव्यामध्ये गुतांगुत होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा.

४. प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली वादीचे विद्वान वकील श्री एम. बी. गाजरे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे युक्तिवाद नाही.

५. प्रकरणाची कागदपत्रे पाहता दावामिळकत ग च्या सातबारा उता—यावर मौजे तारापूर, ता. पंढरपूर असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. सबब सदर मिळकत मौजे भोयरे, ता. मोहोळ येथील असल्याची अनावधानाने नमुद करण्यात आलेली आहे असे दिसते. सदरील अर्जातील दुरूस्ती तांत्रीक स्वरूपाची असून त्यामुळे मुळ दाव्याचे स्वरूपात बदलणार नाही. म्हणून सदर अर्जात दुरूस्ती करणे न्यायसंगत राहील. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१ अर्ज निशाणी ७० मंजूर करण्यात आला.

२ अर्जदारांनी वादपत्रात सदर दुरुस्ती दिनांक ०७.११.२०१६ रोजी किंवा त्यापुर्वी करावी आणि वादपत्राची दुरुस्त प्रत सादर करावी.

दिनांकः ०५.१०.२०१६ ( हे. भा. सिरसाळकर)

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर पंढरपूर.**

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order

a) Name of the Stenographer/Jr. Clerk : A. B. Shaikh

b) Court : C.J.S.D. Court Pandharpur

c) Order signed by P. O. : 05/10/2016

d) Order uploaded on : 06/10/2016.